# प्रस्तावना

वाहतूक पोलिसांचा पूर्वइतिहास पाहिला तर आपल्याला असे दिसून येते की यांत्रिकी वाहन रस्त्यावर आल्यामुळे रस्त्यावरील अपघातांमध्ये वाढ झाली आहे. त्यामुळे नियंत्रणाची आवश्यकता वाटू लागली सदरची जबाबदारी पोलिसांवर निश्चित करण्यात आली त्यातून वाहतूक पोलिसाचा जन्म झाला.

दैनंदिन कामकाज करणाऱ्या पोलिसांपासून वाहतूक पोलीस विभाग वेगळा करण्यात आला त्यात वाहतूक नियमन व कारवाई ही प्रमुख जबाबदारी सोपविण्यात आली वाहतूक पोलीस निवड करता काही निकष लावण्यात आले. शिक्षण, वाहन चालवण्याचे कौशल्य इतर कामकाज व संभाषण कौशल्य या बाबींचा यात समावेश करण्यात आला त्याकरीता वाहतूक पोलीस अंमलदारांच्या अंगी असणारे गुण या पाठात दिलेले आहेत वाहतूक पोलीस हे जनतेमध्ये पोलीस दलाचा आरसा म्हणून ओळखले जातात त्याचे कारण सर्व प्रकारच्या परिस्थितीमध्ये जनतेच्या समोर फक्त वाहतूक पोलिसच असतो.

समाजात कायदा व सुव्यवस्था राखणे, परिस्थितीवर नियंत्रण ठेवणे, वाहतुकीवर नियंत्रण ठेवणे अशा सर्व प्रकारची कामे वाहतूक पोलिसाला करावी लागतात त्यामुळे सहाजिकच वाहतूक पोलिसांची जबाबदारी वाढते.

# वाहतुक पोलीसांचे जनतेशी वागणुक तसेच त्यांचे अंगी पाहीजे असलेले गुण व त्यांचे कर्तव्

वाहतूक पोलिसांनी त्यांच्यावर असलेली वाहतूक नियंत्रणाची जबाबदारी यशस्वीरीत्या पूर्ण करण्यासाठी त्यांच्या दैनंदिन कर्तव्या बरोबरच जनतेशी सुसंवाद साधण्याची आवश्यकता आहे त्याकरता खालील बाबी विचारात घेणे आवश्यक आहे.

1) वाहतुक पोलसांचा गणवेश  नेहमी अत्यंत स्वच्छ असणे आवश्यक आहे त्यामुळे जनमानसात वाहतुक पोलीसाची प्रतिमा जनमानसात स्वच्छ राहणेस मदत होते.
2) वाहतूक नियमनाकरिता आवश्क असलेले सर्व ज्ञान त्याने घेणे गरजेचे आहे.
3) सार्वजनिकरित्या कुठलेही अपकृत्य त्याच्याकडून घडले जाणार नाही याची त्यांनी नेहमी खबरदारी घेतली पाहिजे.
4) वाहतूक पोलिसांची भूमिका संशयास्पद नको सर्व थरातील नागरिकांना समान न्यायदान करता येणे आवश्यक आहे.
5) कायदेविषयक संपूर्ण ज्ञान असणे आवश्यक आहे जनतेने किंवा प्रवाशाने त्यास विचारलेल्या सर्व शंकांचे निरसन त्यास करता आले पाहिजे.
6) कोणत्याही प्रसंगी त्याने स्वतःचा मानसिक समतोल ढळू देता कामा नये. सर्व प्रसंगांमध्ये त्याला खंबीरपणे जनतेच्या समोर उभे राहून शंकांचे समाधान करता आले पाहिजे.
7) सर्वसामान्य जनतेमध्ये वाहतूक विषयक जनजागृती करण्याकरता त्याने सदैव तत्पर असले पाहिजे, सदैव उत्साही असले पाहिजे.
8) मिळालेला वेळ व प्रसंगानुसार त्याने नियमित जनतेशी संपर्क साधून वाहतूक, अपघात, कायदासंबधी करावयाची अंमलबजावणी याबाबत मार्गदर्शन व चर्चा केली पाहिजे जेणेकरून वाहतूक जनजागृती होऊन जनतेच्या मनात वाहतूक पोलिसांविषयी चांगली भावना निर्माण होण्यास मदत होईल.
9) वाहतूक पोलिस त्याचे कर्तव्य पार पाडत असताना येणाऱ्या-जाणाऱ्या जनतेच्या मनात त्याचे विषयी विविध प्रकारच्या प्रश्न स्वरूपात भावना असतात त्याकरीता कर्तव्य वरचे वर्तन चांगले रित्या जनतेच्या मनात भरेल असे पाहिजे.
10) वयोवृद्ध इसम, महिला, लहान मुले यांच्या बाबतीत नेहमी मदतीची व सहानुभूतीची भूमिका ठेवली पाहिजे उदा. वयोवृद्ध इसमांना रस्ता ओलांडून देणे, लहान बालक व स्त्रिया यांना वाहतुकीच्या अनुषंगाने मदत करणे हा हेतू ठेवला पाहिजे.
11) सेवाभावी संस्था, शैक्षणिक संस्था, शाळा याठिकाणी वाहतूक विषयक जनजागृती करण्याकरिता स्वयंस्फूर्तीने जाऊन कार्यक्रमव्दारे जनजागृती केली पाहिजे.

12) आपल्याला नेमून दिलेल्या क्षेत्रांमध्ये कुठल्याही प्रकारची अवैध वाहतूक, चोरटी वाहतूक होणार नाही याकडे कटाक्षाने लक्ष दिले पाहिजे. त्याकरता कठोर उपाययोजना केली पाहिजे.

13) सर्वसामान्य जनतेच्या जीविताचे संरक्षण ही आपली प्रमुख जबाबदारी आहे आणि ती जबाबदारी पार पाडण्याकरता असलेले वाहतूक नियम, त्यावरील उपाय योजना याबाबत सक्त अंमलबजावणी केली पाहिजे.

14) वाहतूक नियंत्रण व त्याचे मदतनीस घटक कोणते, त्यांची जबाबदारी काय याचा अभ्यास करून त्यांच्याशी समन्वय साधून वाहतूक व्यवस्थापन कसे व्यवस्थित राहील याबाबत नेहमी मी प्रयत्नशील असले पाहिजे.

15) वाहतुकीच्या अनुषंगाने केलेले कामकाज व त्यांची जनतेच्या समोर केलेली मांडणी याची वेळोवेळी सांगड घालून त्याचे रेकॉर्ड जतन करणे आवश्यक आहे.

16) रिक्षा, टॅक्सी, टेम्पो व खाजगी बस स्टॅड / थांबे अशी भाडोत्री व प्रवासी वाहने नेहमी रांगेतच येतील. याची दक्षता घ्यावी जेणे करुन प्रवाशांना येण्याजाण्यास सुलभता येईल. व इतर वाहनांना वाहतुकीच अडथळा होणार नाही.

17) वाहतुक पोलीस कारवाई करीत असतांना वादविवाद झाले तरी अपराध्यांशी उध्दटपणे वागु नये. त्यांना शिवीगाळ करु नये किंवा त्यांना मारहाण करु नये. लोकांबरोबर आपली भाषा नेहमी सभ्यतेची व मवाळकीची असावी.

18) वाहनचालकांना शिस्त् लावणे हा उद्देश असावा. शिक्षा देणे हा उद्देश नसावा.

19) वाहतुक व्यवसथापन करतांना वाहतुक नियमांचे उल्लघण केलेल्या एखाद्या वाहनचालकास त्याच्या अपराधाबाबत दंड केल्यास त्याने अपराध केला अशी त्यास जाणीव असली तरी तो नाखुश असतो. म्हणुन अशा वाहनचालकाशी डोकेशांत ठेवुन दंडवसुल केल्यावर व्यवहार कुशलता म्हणुन जाणीवपुर्वक धन्यवाद द्यावे. तसेच वाहतुक तपासणीत ज्यांनी काहीच अपराध केला नाही. त्यांनाही जाणीवपुर्वक धन्यवाद द्यावे.

20) वाहतुक नियमाचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकास दंड भरावयाचा असल्यास जागीच दंड करुन रितसर पावती देउन त्यास त्वरीत मोकळे करावे. त्यास उगीचच ताटकळत ठेवु नये. तथापी त्याचा चालक परवाना व इतर कागदपत्रे बनावट असल्याचा संशय असल्यास किंवा अपुरी असल्यास त्यास त्याबाबत स्पष्ट सुचना द्याव्यात त्यात पारदर्शीपणा असावा. हि कारवाई प्रथमदर्शनी ठिकाणी करावी.

21) वाहतुक पोलीसाने कर्तव्यावर असतांना धुम्रपान करणे, नशेत असणे, तोंडात पान असणे काहीही चावत बसणे, इत्यादी गोष्टी टाळाव्यात कारण सर्व जनतेचे लक्ष वाहतुक पोलीसांकडे असते व त्यामुळे पोलीसांची जनमानसांतील प्रतिमा मलिन होते.

अशा रीतीने आपण सर्वसामान्य जनतेशी सुसंवाद साधला तर निश्चितपणे जनजागृती होऊन अपघात व मृत्यू कमी होऊन खऱ्या अर्थाने सामाजिक बांधिलकी जपणे शक्य होईल.